MHJN020005472013

नियमित दिवाणी दावा क्र.२२१/२०१३
निलावती व इतर वि. शासन व इतर
CNRMHJN020005472013

## निशाणी क्रमांक १२५ वरील आदेश

सदरचा अर्ज वादींतर्फे निशाणी क्र.५५ वरील काढलेल्या मुद्दांपैकी मुद्दा क्र.०८ वगळून मिळणेकामी दिला आहे.

२) अर्जातील कथने थोडक्यात पुढील प्रमाणे –

सदरचा दावा वादींनी देविदास गिरजुबा डोंगरे यांचे कायदेशीर वारस असल्याने वारसाहक्का आधारे मालक व ताबेदार असून प्रतिवादी क्र.६ हौशल्याबाई यांनी नोंदवून दिलेले विक्रीपत्र क्र.१६९२/२०१३ व ८८/२०१७ बेकायदेशीर असल्याने प्रतिवादी क्र.३ यांनी दिलेला निर्णय बेकायदेशीर घोषित होवून मनाई हुकूम मिळणेसाठी दाखल केला आहे. वादींनी दाव्यात जमिनीची वाटणी मागितलेली नाही. त्याप्रमाणे प्रतिवादी क्र.७ मुरलीधर डोंगरे यांच्या ताब्यात देविदास डोंगर यांन स्वखुशीने तडजोड करुन ताब्यात दिलेली आहे. तसेच, सदर मिळकतीशी वादींचा हक्कसंबंध राहिलेला नाही असे दाव्यात मुद्दा क्र.१२ मध्ये नमूद केले आहे. दाव्यात वाटपाची मागणी नसल्याने दाव्यात आवश्यक पक्षकार सामील केले नसल्याबद्दलचा मुद्दा आवश्यक नाही. त्यामुळे

सदर मुद्दा वगळण्याची मागणी वादींतर्फे प्रतिज्ञापुर्वक केली आहे. सबब, प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

३) प्रतिवादी क्र.१ ते ५, ७ व ९ तर्फे अर्जास कोणतेही म्हणणे दिलेले नाहीत. त्यामुळे अर्ज त्यांचे म्हणणे शिवाय चालविण्यात येत आहे. प्रतिवादी क्र.६ व ८ तर्फे सदर अर्जास अर्जावरच आपले म्हणणे दिले आहे. अर्जातील सर्व विरोधी कथने प्रतिवादी क्र.६ व ८ यांनी नाकारली आहेत. प्रतिवादी क्र.६ व ८ यांनी कैफियतीतील कथनांनुसार मुद्दा क्र.८ बरोबर आहे. त्यामुळे अर्ज नामंजूर करण्यात यावा.

४) वादीं व प्रतिवादी क्र.६ व ८ तर्फे सुविद्य वकीलांचा युक्तीवाद ऐकला. कागदपत्रांचे अवलोकन केले.

५) वादींतर्फे सदरचा अर्ज दावा वादींच्या पुराव्याकामी नेमलेला असताना दिला आहे. त्यानुसार वादींनी दाव्यात वाटपाची मागणी केलेली नाही. परंतु, दाव्यास आवश्यक पक्षकार सामील नसल्याचा मुद्दा क्र.८ निशाणी क्र.५५ वरील मुद्दांमध्ये काढलेला आहे. प्रतिवादी क्र.७ यांच्या ताब्यात देविदास डोंगरे यांनी स्वखुशीने तडजोड करुन जमीन गट क्र.२९१ मधील क्षेत्र ८१ आर दिले आहे. सदरचा मुद्दा दाव्यातील

मागणीच्या अनुषंगाने नाही. त्यामुळे सदरचा मुद्दा वगळणे आवश्यक व गरजेचे असल्याचे वादींतर्फे स्पष्ट करण्यात आले आहे. प्रतिवादी क्र.६ व ८ तर्फे अर्जास विरोध दर्शविताना कैफियतीतील कथनांनुसार मुद्दा बरोबर असल्याचे नमूद केले आहे.

६) अर्जातील मागणीच्या अनुषंगाने दाव्याचे अभिलेखावरील दावा, प्रतिवादी क्र.६ ते ८ यांची कैफियत यांचा एकत्रित विचार करता दाव्यात पुरावा चालु असताना मुद्दा क्र.८ वगळल्यास प्रतिवादींचे हक्कास बाध पोहचणार आहे. तसेच, दाव्याचे गुणदोषावर निकाल होणेकामी सदर मुद्दा आवश्यक आहे. त्यामुळे सदरचा अर्ज तथ्यहिन आहे. याकरिता सदरचा अर्ज खर्चाशिवाय नामंजुर करण्यात येत आहे. म्हणून मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

| | |
|---|---|
| | सदरचा अर्ज खर्चाशिवाय नामंजुर करण्यात येत आहे. |

स्वाक्षरीत/-
(एन. एल. येवलेकर)
दिवाणी न्यायाधीश व.स्तर
जालना

दिनांकः ११/१२/२०२३

**<u>प्रमाणपत्र</u>**

प्रमाणित करण्यात येते की, पी.डी.एफ. फाईल मधील शब्द न शब्द मुळ निकालपत्रा प्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नाव : एम. डी. आढे

न्यायालयाचे नाव : दिवाणी न्यायालय व.स्तर, जालना

दिनांक : ११/१२/२०२३

सही/–

एम. डी. आढे

लघुलेखक (ग्रेड–३)